**सं. फौ. खं. क्र. १०४६/२०२२**
**सरकार वि. शेख युसुफ**
**निशाणी ११**

सरकारतर्फे साक्षीदार क्र.१ यांची जबानी

मी याद्वारे प्रतिज्ञापुर्वक निवेदन करतो की,

माझे नांव – रविंद्र वसंतराव केने
वय – ४९ वर्ष धंदा – मजूरी
पत्ता – खंडाळा घटाटे, ता. पारशिवनी, जि. नागपूर.

**सरतपास अभियोग पक्षातर्फे सरकारी वकील श्रीमती एस.व्ही. रामटेके यांच्या तर्फे**

१. दिनांक १२/०६/२०२२ रोजी पोलीसांनी मला पंचनाम्यासाठी बोलाविले नव्हते. पोलीसांनी माझ्या समक्ष कोणतीही पंचनाम्याची कारवाई केली नाही. आता मला नोटीस दाखविली, त्यावर माझी सही नाही. त्यातील मजकूर मला माहिती नाही. पोलीसांनी माझी सही चहाच्या टपरीवर घेतली होती. आता मला घटनास्थळ पंचनामा दाखविला, त्यावर माझी सही आहे. त्यातील मजकूर मला माहिती नाही. सहीला **निशाणी १२** देण्यात येते.

**साक्षीदार अभियोग पक्षास सहाय्य करत नसल्यामुळे अभियोग पक्षाने उत्तर सुचक प्रश्न विचारण्याची परवानगी मागितली. परवानगी देण्यात आली.**

२. हे म्हणणे खरे नाही की दि.१२/०६/२०२२ रोजी पोलीसांनी मला पंचनाम्यासाठी राष्टीय महामार्ग खंडाळा शिवार कन्हान येथे बोलाविले होते. हे म्हणणे खरे नाही की त्याप्रमाणे मी घटनास्थळी गेलो. हे म्हणणे खरे नाही की पोलीसांनी माझ्या समक्ष घटनास्थळ पंचनामा तयार केला, मला वाचून दाखविला व त्यानंतर मी त्यावर सही केली. हे म्हणणे खरे नाही की आरोपीला वाचविण्यासाठी आज रोजी मी खोटी साक्ष देत आहे.

**सरतपास पूर्ण**

**उलटतपास आरोपीतर्फे वकील रिना गणवीर यांच्यातर्फे.**

**नाकारला.**

श्रवणोत्तर स्वीकृत/समक्ष

सही/–
**(रा.र. शेरेकर)**
प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, न्या. क्र. ३, कामठी.

ठिकाण –कामठी
दिनांक –२५/०१/२०२४